- प्रेस नोट -

दि. २६/१०/२०२६

घाटकोपर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.२५/१०/२०२६ रोजी २०:१० वा. च्या सुमारास महिला फिर्यादी, वय-२२ वर्षे, धंदा- नाही, रा.ठी. सर्वोदय मंदिराजवळ, घाटकोपर रेल्वे स्टेशन रोड, घाटकोपर पश्चिम, मुंबई. यांचे पती अटक आरोपी पुरूष वय- २३ वर्षे याने घाटकोपर रेल्वे स्टेशन पश्चिम येथील स्कायवॉकवर फिर्यादी सोबत वाद घालून शिवीगाळ केली तसेच फिर्यादी व त्यांचा मुलगा यांना स्कायवॉकवरून खाली फेकण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांनी मुलाला परत मागितले असता अटक आरोपीने राग मनात धरून मुलाचा जीव घेण्याच्या इरादयाने मुलास खाली फेकल्याने त्याच्या डोक्यास गंभीर दुखापत झाल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. २६/१०/२०२६ रोजी गु.र.क्र. १२८०/२६, कलम१०९(१), ३५१(३), ३५२ बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
